# १०. छोटीशी बी

CMKJP6

- **ऐका. म्हणा. वाचा.**



छोटीशी बी, रुसू नको
जमिनीत नुसती बसू नको,
माती-पाण्याचे गुण घेऊन
वर यायला विसरू नको.



कोंबा कोंबा रुसू नको
देठात लपून राहू नको,
लाल तांबूस रंग घेऊन
पान द्यायला विसरू नको.



पाना पाना, रुसू नको
बालपणात बसू नको,
दोन हातांची ओंजळ करून
कळी द्यायला विसरू नको.



कळी कळी, रुसू नको
घट्ट पाकळ्यांत बसू नको,
पाकळ्यातून फुलून-खुलून
फूल द्यायला विसरू नको.

फुला फुला, रुसू नको
कोण बघतंय बघू नको,
रंगगंधात डोल डोलून
'बी' द्यायला विसरू नको.

**- माया धुप्पड**

**शब्दार्थ : ओंजळ** - दोन्ही तळहात जोडल्यावर तयार झालेला खोलगट भाग. **डोलणे** - मान हालवणे.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) कवयित्रीने 'बी'ला वर येण्यासाठी कोणाचे गुण घ्यायला सांगितले?

(आ) कोंबाने कोणते रंग घेऊन वर यावे असे कवयित्रीला वाटते?

(इ) पानाला बालपण सोडून देण्यास कवयित्री का सांगते?


(ई) कवयित्री कळीपासून कोणती अपेक्षा करते?

(उ) कवयित्री फुलाला कोणती गोष्ट विसरू नको म्हणून सांगते?

**प्र. २. 'बी' चे पुन्हा बीमध्ये रूपांतर होण्याच्या क्रिया क्रमाने लिहा.**

छोटीशी बी → [ ] → [ ] → [ ] → [ ] →

**प्र. ३. 'हात' या शब्दाचे विविध उपयोग लिहा.**




**प्र. ४. या कवितेत रुसू, बसू यांसारखे शब्द आले आहेत, अशा शब्दांची यादी लिहा.**

**प्र. ५. खालील शब्दांचे अनेकवचन वाचा व समजून घ्या. दिलेल्या शब्दांचे अनेकवचन करा.**

उदा., बी -बिया, सुई- सुया

(१) कळी (२) कैरी (३) पाकळी (४) वही

**प्र. ६. खालील यादी वाचा. त्यांतील बियांपासून व फांदीपासून तयार होणारी झाडे असे वर्गीकरण लिहा.**

उदा., गुलाब- फांदीपासून, पारिजातक - बियांपासून,

मोगरा, जास्वंद, चाफा, गोकर्ण, कोरंटी, कमळ, आंबा, जांभूळ, केळी, फणस, ऊस, ज्वारी, बाभूळ, पानफुटी, कांदा, लसूण, झेंडू, सूर्यफूल.

**प्र. ७. वाचा व लिहा.**

दोन हात एकत्र करतो, त्याला आपण ओंजळ म्हणतो.

ओंजळभर पाणी, ओंजळभर धान्य, ओंजळभर फुले असे शब्दप्रयोग बोलण्यात करतो. टिचभर, हातभर, बोटभर, पसाभर हे शब्द वापरून वाक्ये लिहा.

**उपक्रम :** विविध फुलझाडांची चित्रे काढा व रंगवा.


**प्रकल्प :**

वर्षभरात घरी खाल्लेल्या फळांच्या बिया गोळा करा. त्यांच्या आकारांचे निरीक्षण करा. एका मोठ्या कॅलेंडरसारख्या रंगीत कागदांवर पानाफुलांची आकृती काढा. त्यावर वेगवेगळ्या आकाराच्या बिया चिकटवा. रंग द्या. तो कागद वर्गात, घरी भिंतीवर लावा.

- **खालील घोषवाक्ये वाचा.**

| | | |
|---|---|---|
| झाडे वाढवूया,<br>शहरे वाचवूया. | जिथे स्वच्छ हवा,<br>तिथे आरोग्याचा ठेवा. | कावळा म्हणतो काव-काव,<br>माणसा-माणसा झाडे लाव. |

- **खालील चित्राला लावलेली विशेषणे वाचा. दुसऱ्या चित्राला योग्य विशेषणे लावा.**







- **वाचा.**

मराठी भाषेतील शब्दांच्या शेवटी येणारा इ-कार किंवा उ-कार उच्चारानुसार **दीर्घ** लिहितात.

उदा. आई, केळी, करंजी, खिडकी, मामी, वही, संधी, सुपारी, काकी, कवी, पेरू, वाळू, मधू, खेळू, माऊ, गुरू, सुरू, सांगू, काजू.

'आणि' व 'परंतु' या शब्दांचा इ- कार व उ- कार **ऱ्हस्व** लिहितात.

- **खालील चित्रे पाहा. त्यांची नावे लिहा.**

**शोध घेऊया.**

- **खालील सूचना फलक वाचा. खालील सूचना कोठे-कोठे असतात ते सांगा. तुमच्या शाळेच्या परिसरात कोणकोणत्या सूचनांचे फलक लावता येतील, ते मित्रांशी चर्चा करून ठरवा. तसे सूचना फलक तयार करा.**

| | | |
|---|---|---|
| हा खासगी रस्ता आहे. | येथे कचरा टाकू नये. | येथे जाहिराती लावू नयेत. |
| येथे थुंकू नये. | येथे वाहने लावू नयेत. | हे पिण्याचे पाणी आहे. |